

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/९१५ दिनांक : ११/०६/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य/मा. संचालक,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : अपंग विद्यार्थ्यांकरिता ५% आरक्षण व अडथळाविरहित वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना.

**संदर्भ क्र.** : मा. सक्षम न्यायाधिकारी तथा आयुक्त अपंग कल्याण यांचे न्यायाधिकरण (अपंग कल्याण आयुक्तालय) ३ चर्चरोड, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांचे अकआ/प्र–७/रिया क्र. २९२/२००६ व क्र. ९९७/२०१३/२०१८–१९/२१८४ दि. ०५ मे, २०१८ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सर्वोच्च न्यायालय रिट याचिका क्र. २९२/२००६ व क्र. ९९७/२०१३ डिसेबल राईट्स ग्रुप व इतर विरूद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

१. अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील कलम ३२ अन्वये राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये अपंग विद्यार्थ्यांकरिता ५ टक्के आरक्षण ठेवावे.

२. अपंगांना अडथळा विरहित वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

३. यासंबंधीचा कार्यपूर्ती अहवाल २५ जून, २०१८ पर्यंत सादर करावा.

आपल्या महाविद्यालयात व परिसंस्थेत सदर निर्देशानुसार उपाययोजना कराव्यात. याबाबतचा अहवाल मा. सक्षम न्यायाधिकारी तथा आयुक्त अपंग कल्याण यांचे न्यायाधिकरण (अपंग कल्याण आयुक्तालय) ३ चर्चरोड, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे निर्गमित करावयाचा असल्याने आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधान्याने विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयास २५ जून, २०१८ पर्यंत पाठविण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ